# *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र.रामाआ/नाशिक/तक्रार क्र. : ३०६/२०१८/नाशिक**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. प्रविण विश्वनाथ कडाळे,<br>रा.अयोध्या नगर, पंचक, जेलरोड, नाशिकरोड,<br>ता.जि.नाशिक. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा,<br>संशोधन अधिकारी,<br>सहआयुक्त तथा उपाध्यक्ष अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती यांचे कार्यालय, आदिवासी विकास भवन, दुसरा मजला, गडकरी चौक, जुना मुंबई आग्रा रोड, ता.जि.नाशिक-०३. | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>वरीष्ठ संशोधन अधिकारी,<br>सहआयुक्त तथा उपाध्यक्ष अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती यांचे कार्यालय, आदिवासी विकास भवन, दुसरा मजला, गडकरी चौक, जुना मुंबई आग्रा रोड, ता.जि.नाशिक-०३. | : | प्रतिवादी |

**<u>सुनावणी दिनांक - ०९/१०/२०१९</u>**

तक्रारदार यांनी दिनांक २८/०२/२०१८ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक ०९/१०/२०१९ रोजी सुनावणीसाठी तक्रारदार अनुपस्थित होते. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

तक्रारदार यांनी त्यांच्या दिनांक २८/०२/२०१८ रोजीच्या तक्रार अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १६/०३/२०१५ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने द्वितीय अपील क्रमांक ४५०५/२०१५/नाशिक वरील निर्णय दिनांक १९/०९/२०१७ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६/०३/२०१५ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात व्यक्तीगत माहिती सोडून उर्वरीत कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी." तथापि, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार माहिती

पुरविली नाही. जात पडताळणी शासनाचा सावळा गोंधळ व बेकायदेशीर प्रकार लपविण्याकरिता माहिती अधिकारी कार्यकर्त्यास माहिती देण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ करत आहेत. तरी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही करावी, अशी विनंती सदर तक्रार अर्जान्वये तक्रारदार यांनी केली आहे.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, आयोगाच्या द्वितीय अपील क्रमांक ४५०५/२०१५/नाशिक वरील निर्णय दिनांक १९/०९/२०१७ रोजीच्या पारित आदेशास अनुसरुन तक्रारदारास दिनांक १६/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये विनामूल्य माहिती पुरविली आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, आयोगाच्या उपरोक्त नमूद द्वितीय अपील क्रमांक ४५०५/२०१५/नाशिक वरील निर्णय दिनांक १९/०९/२०१७ रोजीच्या आयोगाच्या पारित आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्यानुसार तक्रारदार यांना कार्यालयातील उपलब्ध माहिती विनामूल्य पुरविल्याचे स्पष्ट होते. यावरुन विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही, ही बाब विचारात घेता तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असून प्रस्तुत तक्रारीत काहीही तथ्य नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

तक्रार क्रमांक ३०६/२०१८/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

**(के.एल.बिश्नोई)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक